राज्य योजना सन २०१८-१९
हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२१३/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ मार्च, २०१९.

वाचा :-

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र २१३/फ-१, दि. १९.०५.२०१८.
३. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र २१३/फ-१, दि. २७.०८.२०१८.
४. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.
५. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१८/प्र क्र २१३/फ-१, दि. ०१.०२.२०१९.
६. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९.
७. शासन पत्र, महसूल व वन विभाग, पत्र क्रमांक :- बीयूडी-२०१९/२४०६/प्र.क्र. १९/ब-१, दिनांक ११.०३.२०१९.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/ चाबाप्र/ प्र.क्र.३२/२४०७/२०१८-१९, नागपूर दि. २०.०३.२०१९

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ राज्यस्तरीय योजनेअंतर्गत हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत संदर्भ क्रमांक २,३, व ५ च्या शासन निर्णयान्वये आतापर्यत रु. १२००.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

आता संदर्भ क्रमांक ७ च्या शासन पत्रान्वये सन २०१८-२०१९ चा आठमाही सुधारीत अदाज जारी करण्यात आला असून त्यात हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १९८४.०० लक्ष निधी दर्शविण्यात आला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ७ च्या परिपत्रकानुसार आठमाही सुधारीत अदाजाच्या मर्यादेत निधी वितरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

सबब हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या लेखाशिर्षाअंतर्गत रु. ७८४.०० लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ८ च्या पत्रान्वये कोयना अभयारण्यातील जावळी तालुक्यातील रवंदी, आडोशी, माडोशी, कुसापूर, खिरखिंडी या पाच गावांचे मौजे. एकसाल सागाव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे पुनर्वसन करण्याकरिता हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या योजनेंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास अनसरुन खालील अटींच्या अधीन राहून **रुपये ७८४.०० लक्ष निधी** सोबत जोडलेल्या विवरणपत्रा नुसार खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. प्रस्तावीत खर्चः- लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव संरक्षण (००) (११) हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (राज्य) (२४०६-२२४१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून आणि सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार खर्च करण्यात यावा.

२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

३. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

४. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

५. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

६. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक - १७.०४.२०१५, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.४.२०१८, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१६५१३४०२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.22 17:01:20 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
५. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर.
६. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
७. फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२१३/फ-१, दिनांक २२ मार्च, २०१९ सोबतचे विवरणपत्र.

योजनेचे नांव	**गावाचे नाव**	**विवरण**	**वितरीत निधी (रक्कम रु. लाखात)**
राज्य स्तरीय योजना हक्क निर्धारीत करणे, राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य परिसरातील गावाचे पुनर्वसन व भुसंपादन (२४०६ २२४१)	कोयना अभयारण्यातील जावळी तालुक्यातील रवंदी, आडोशी, माडोशी, कुसापूर, खिरखिंडी या पाच गावांचे मौजे. एकसाल सागाव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे पुनर्वसन करणे.	जावळी तालुक्यातील रवंदी, आडोशी, माडोशी, कुसापूर, खिरखिंडी या पाच गावांचे मौजे. एकसाल सागाव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे पुनर्वसन वसाहतीला नागरी सुविधा पुरविणे.	३९८.६७
		जावळी तालुक्यातील रवंदी, आडोशी, माडोशी, कुसापूर, खिरखिंडी या पाच गावांचे खातेदारांना मालमत्तेची किंमत देणे.	३८५.३३
		एकूण	**७८४.००**